गांवकरी



■ नाशिक, शनिवार दि. ७ जानेवारी २०१७

# नाशिकच्या ब्रँडिंगसाठी नाशिक महोत्सव : ना. रावल

## ▶▶ टुरिझम एक्स्पो २०१७ चे शानदार उद्घाटन

। नाशिक । वार्ताहर ।

काही दिवसांपूर्वी झालेल्या बैठकीत सर्वाधिक निधी हा नाशिक विभागासाठी देण्यात आलेला असून, आचारसंहिता संपताच काम सुरू होईल. कोकणइतकेच महत्व नाशिकला असल्याने विभागातील पर्यटनाला मोठी चालना मिळणार आहे. याकरीता १० ते १५ दिवसांचा नाशिक महोत्सव घेण्याचे सूतोवाच राज्याचे पर्यटनमंत्री जयकुमार रावल यांनी केले.

दरम्यान, देश-विदेशातून क्रूझद्वारे आलेल्या पर्यटकांना दोन दिवसांसाठी नाशिकला आणण्याचे नियोजन असल्याचेही त्यांनी सांगितले. ट्रॅव्हल्स एजंटस् असोसिएशन ऑफ नाशिक (तान) या पर्यटनविषयक प्रवास सुविधा पुरविणाऱ्या व्यावसायिक संघटनेतर्फे काल (दि.६) पासून तीन दिवसीय टुरिझम एक्स्पो २०१७ या प्रदर्शनाचे उद्घाटन ना. रावल यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी ते बोलत होते. आगर टाकळी येथील रामदास स्वामी मठ व परिसराच्या पहिल्या कामाच्या टप्प्याला मंजूरी देण्यात आली आहे. नाशिक विभागाला सर्वाधिक निधी मंजूर करण्यात आलेला आहे. यंदाचे पर्यटन २०१७ हे वर्ष जाहीर करण्यात आले असल्याने अनलिमिटेड महाराष्ट्र, बर्फ सोडून सर्व काही हे पर्यटकांसाठी आहे, असे ना. रावल यांनी सांगितले.

महाराष्ट्रात वेगवेगळ्या योजना आखण्यात आलेल्या असून, इगतपुरी येथे एक वेलनेस सेंटर म्हणून उभारले जाणार आहे. तसेच तान आणि वाईन असोसिएशन यांच्या सहकार्याने महाराष्ट्र शासनाच्या सहभागातून १० ते १५ दिवसांच्या कालावधीचा नाशिक महोत्सव घेतला जाईल, असे सांगून ना. जयकुमार रावल यांनी नाशिकचे ब्रँडिंग होण्यासाठी देश-विदेशातून मुंबईत येणाऱ्या क्रूझद्वारे आलेल्या पर्यटकांना थेट नाशिकला आणून किमान दोन दिवसांचे त्यांचे पर्यटन घडविण्याचे नियोजन केले जात असल्याची माहिती त्यांनी दिली. यावेळी आ. बाळासाहेब सानप यांनी तानचे काम चांगले असून, कुंभमेळ्यात मोठे सहकार्य केले, असे कौतुक केले. तानचे अध्यक्ष दत्ता भालेराव यांनी नाशिकचे पर्यटन वाढविण्यासाठी प्रयत्न सुरू असून, या व्यवसायाला अच्छे दिन येत असल्याचे सांगितले. नाशिकला गंगाआरती रोज व्हावी, याकरीता सरकारने मदत करावी, गंगापूर धरणात वॉटर स्पोर्टस् सुरू व्हावेत, ओझरच्या विमानतळाला चालना द्यावी, अशी मागणी केली. याप्रसंगी तानचे माजी अध्यक्ष व दुर्वांकूर टूर्सचे संचालक मिलिंद सोहकरे यांना अँचिव्हमेंट अँवॉर्ड देऊन ना. रावल यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. व्यासपीठावर आ. देवयानी फरांदे, चौधरी यात्रा कंपनीचे ब्रीजमोहन चौधरी, मनोज वासवानी,



। नाशिक । टुरिझम एक्स्पो २०१७ या प्रदर्शनाचे उद्घाटन करताना पर्यटनमंत्री जयकुमार रावल. समवेत राजेंद्र बकरे, दत्ता भालेराव, आ. देवयानी फरांदे, आ. बाळासाहेब सानप, मनोज वासवाणी, लक्ष्मण सावजी, सागर वाघचौरे आदी.

अंबरीश मोरे, भाजपाचे प्रदेश उपाध्यक्ष लक्ष्मण सावजी होते. कार्यक्रमास पर्यटन महामंडळाचे प्रादेशिक व्यवस्थापक नितीन मुंडावरे, धनंजय बेळे, जगदीश होळकर उपस्थित होते. प्रास्ताविक सागर वाघचौरे यांनी तर आभार राजेंद्र बकरे यांनी मानले.